दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

RNI NO. MAHMAR/2023/84162

● वर्ष २ रे ● अंक ६४ वा ● रविवार २१ जुलै २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 64 | Date : 21/07/2024 | blow Sunday Page 4 Price 4



**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८




## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी २५ हजार कोटींची तरतूद

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे : राज्यातील भगिनींसाठी सुरु करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी २५ हजार कोटींची तरतूद करण्यात आली असून जुलै महिन्यापासून या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केले.विधानभवन येथे आयोजित या बैठकीस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार, खासदार मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे, डॉ. अमोल कोल्हे, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण इंदलकर आदी उपस्थित होते. योजनेविषयी माहिती देताना उपमुख्यमंत्री । पान ३ वर

## अक्कलकोटमध्ये गुरूपौर्णिमेसाठी लाखाहून जास्त भाविक दाखल

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्क्लकोट/प्रतिनिधीः दत्तात्रेयाचे चौथे अवतार मानल्या गेलेल्या अक्कलकोटनिवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिर आणि शेजारच्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात रविवारी होणाऱ्या गुरूपौर्णिमा उत्सवाची जयत तयारी केली जात आहे. शनिवार आणि रविवार सलग दोन सुट्ट्यांचा योग आल्यामुळे अक्कलकोटमध्ये लाखापेक्षा जास्त भाविक दाखल होत आहेत.



वटवृक्ष श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरूपौर्णिमेनिमित्त पहाटेपासून विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. विविध दूरच्या भागातील भजनी मंडळे दाखल झाली असून दिवसभर भजनांचा आनंद भाविकांना लुटता येणार आहे. प्रवचनेही होणार आहेत. नगर प्रदक्षिणा व अन्य कार्यक्रमाच्या निमित्ताने अवघी अक्कलकोटनगरी स्वामीमय झाली आहे. शहरात सर्वत्र रस्त्यांवर भगव्या पताका उभारण्यात आल्या आहेत. मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे व सचिव आत्माराम घाटगे यांच्या देखरेखीखाली भाविकांसाठी श्री दर्शनासह निवास व महाप्रसादाचे उत्तम नियोजन केले जात आहे. विशेषतः दर्शन रांगेत भाविकांना त्रास होऊ नये म्हणून कापडु मंडप उभारण्यात आला असून पोलीस सुरक्षा वाढविण्यात आली आहे. मंदिरालगत असलेल्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातही । पान २ वर

## नागपूर येथे मुसळधार पाऊस;
### उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून परिस्थितीचा आढावा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नागपूर : नागपूर शहर आणि जिल्ह्यात आज दि. २० जुलै रोजी सकाळी मुसळधार पावसामुळे वाहतूक व जनजीवन विस्कळित झाले. दुपारनंतर पावसाचा जोर ओसरल्याने सखल भागातील तुंबलेल्या पाण्याचा निचरा झाल्याने जनजीवन व वाहतूक पूर्वपदावर आली. उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाचा जोर लक्षात घेता तत्काळ विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी व जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून आढावा घेतला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन शाळेतील मुलांची गैरसोय होऊ नये म्हणून सुट्टी जाहीर करण्यात आली. नागरिकांची कोणतीही गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने सतर्क राहावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



आज सकाळी साधारणतः सहा वाजल्यापासून मुसळधार पावसाला सुरुवात झाली. शहरातील अनेक सखल भागात पाणी साचले. जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर हे स्वत: विविध सखल भागात जाऊन परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. महानगरपालिका तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मदतीने आवश्यक त्या ठिकाणी अडचणीत असलेल्या नागरिकांपर्यंत मदत पोहोचविण्यात आली. पावसामुळे सकाळी विस्कळीत झालेली वाहतूक दुपारी १२ वाजेपर्यंत पूर्वपदावर आली. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी शहरातील अनेक भागांना भेटी देऊन पाहणी केली.नागपूर ग्रामीण भागात पावसाचे पाणी वस्तीमध्ये घुसल्याने अनेक ठिकाणी लोक अडकून पडले होते. कामठी तालुक्यामध्ये खेडी येथे १५ व्यक्ती, पावनगाव येथे १२ व्यक्ती, महलगाव येथे १० व्यक्ती हे त्यांच्या राहत्या घराच्या परिसराला पाण्याने वेढा पडल्यामुळे अडकले होते. त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. हिंगणा तालुक्यात वाघधरा येथे ५ व्यक्ती वेणा नदीच्या पुरात अडकली होती. एसडीआरएफ मार्फत या व्यक्तींना सुखरुप स्थळी हलविण्यात आले. कुही तालुक्यात २१ घरांची, भिवापूरमध्ये १६ घरांची तर मौदामध्ये १० घरांची पडझड झाली. याठिकाणी महसूल विभागाची टीम प्रत्यक्ष स्थळावर जाऊन आली असून पंचनामे व इतर प्रक्रिया पूर्ण करीत आहे.

## राजीनाम्यावरून काँग्रेसची मोदी सरकारवर टीका



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : एकीकडे देशात सध्या प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर प्रकरणाची चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे यूपीएससीच्या अध्यक्षांनी तडकाफडकी राजीनामा दिला आहे. त्यानंतर आता विविध चर्चांना उधाण आलं आहे. दरम्यान, यावरून काँग्रेसने मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. देशातील संविधानिक संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न मोदी सरकारकडून सुरू असल्याचा आरोप काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे. एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे.

मोदी सरकार आणि आरएसएस देशातील संविधानिक संस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे या संस्थांची प्रतिष्ठा आणि स्वायत्तता धोक्यात आली आहे. मागच्या काही दिवसांत यूपीएससी परीक्षेतील काही घोटाळे समोर आले आहेत. हा राष्ट्रीय सुरक्षेचा विषय आहे. एकंदरितच ही प्रकरणं बघता मोदी सरकारच्या कार्मिक मंत्रालयाने त्यांची चूक स्वीकार केली । पान ३ वर

## पश्चिम घाटात संततधार सुरूच, महापुराचा धोका टाळण्यासाठी अलमट्टीतून १ लाख क्युसेकचा विसर्ग

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सांगली : धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये गेल्या ४८ तासाहून अधिक काळ मुसळधार पाउस पडत असल्याने वारणेचे पाणी यंदाच्या हंगामात दुसर्यांदा पात्राबाहेर पडले आहे. सांगली, कोल्हापूरला निर्माण होत असलेला महापुराचा धोका टाळण्यासाठी कर्नाटकातील अलमट्टी धरणातून शनिवारी दुपारपासून १ लाख क्युसेकचा विसर्ग सुरू करण्यात आला असून रविवारी पावसाचा अंदाज घेऊन यामध्ये वाढ करण्याचे नियोजन असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.



कृष्णा व उपनद्यांच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू असून यामुळे नदीतील पाणी पातळी वाढत आहे. गेल्या २४ तासात कृष्णेतील पाणी पातळी सांगलीतील आयर्विन पुलाजवळ २ फूट ९ इंचाने वाढून १५ फूट झाली आहे. यामध्ये आणखी वाढ अपेक्षित आहे. आज दिवसभर सांगली, मिरजेसह जिल्ह्याच्या पश्चिम भागात संततधार पाऊस पडत होता.

शिराळा तालुक्यात संततधार पाउस सुरू असल्याने वारणा, मोरणा नद्या दुथडी भरून वाहत असून वारणेचे पाणी दुसर्यांदा मळी रानात । पान २ वर

## स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळांचा दिला जाणारा गुणीजन गौरव पुरस्कार शिवशरणप्पा बाळकृष्ण सुरवसे यांना प्रदान

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः वागदरी येथील महाराष्ट्र नाभिक महामंडळ अक्कलकोट तालुका अध्यक्ष शिवशरणप्पा बाळकृष्ण सुरवसे यांना अक्कलकोट तालुक्यातील प्रत्येक गावातील नाभिक समाज बांधवांना एकत्र करण्याचा महत्त्वपूर्ण काम सुरवसे यांनी केले आहे



तालुक्यातील सर्व गावातील समाज बांधवांची माहिती गोळा करून एक हजार जनगणना पुस्तक छापून वागदरी येथे एक हजार समाज बांधवांच्या उपस्थित अनेक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले तालुक्यातील गरीबी सलून दुकानदाराना जिल्हा सेस फंडातून २५ सलून खुर्ची मिळवून दिले,

दहिटणे गावातील गजानन काळे याचे घराला आग लागून घरातील सर्व वस्तू जळाले होते त्या जळीत कुटुंबाला २७००० हजार रुपये व किराणा माल मदत मिळवुन दिले श्री संत सेना महाराज पुण्यतिथी निमित्त रक्तदाब शिबिर आयोजित केले

व जिल्हा परिषद शाळेत लोक सहभागातून मोठ्या प्रमाणात काम केले

सुरवसे यांनी सामाजिक कार्य केल्याबद्दल अक्कलकोट स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा गुरुपौर्णिमा, वर्धापन दिनानिमत मा. जन्मजयराजे भोसले, व अमोलराजे भोसले साहेब,व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणीजन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, यावेळी समाज बांधव मित्र परिवार त्याचं कौतुक करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते

महाराष्ट्र नाभिक महामंडळ पक्षिम महाराष्ट्र विभागीय उपाध्यक्ष सुदर्शन विभूते, जिल्हा कार्याध्यक्ष भागवत विभूते, कर्मचारी महासंघाचे तालुका अध्यक्ष सुभाष सुरवसे सर, अक्कलकोट शहर अध्यक्ष लक्ष्मण विभूते, तालुका युवक अध्यक्ष श्रीशैल सुरवसे, समाज पंच प्रभाकर सुरवसे, सोमनिग सुरवसे,

उपाध्यक्ष राजेश कोरे, खजिनदार प्रविण राऊत, सचिव महेश सुरवसे, नागेश कोरे, शिलसिद्ध राऊत, संजय माने, मल्लिनाथ विभूते ,मलु माने, निगप्पा कोरे ,नागेश सुरवसे, महिला तालुका अध्यक्ष अनूराधा सुरवसे, महिला युवती अध्यक्ष भाग्यश्री काळे, सुनंदा लोखंडे, प्रियंका माने ,स्नेह सुरवसे, उपस्थित होतेर




# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचा ३७ वा. वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा उत्सव

## संपादकीय

### काळजी घ्या..

पावसाळी पर्यटनावर अनेक ठिकाणी बंदी घालण्यास आणि त्याविषयीच्या मार्गदर्शक सूचना जाहीर होण्यास सुरुवात झाली आहे. यासंबंधीच्या बातम्या प्रसार माध्यमांत प्रसिध्द होत आहेत. वन्यजीव विभागाकडून भीमाशंकर अभयारण्याच्या वाटा सप्टेंबरपर्यंत बंद करण्यात आल्या आहेत. त्र्यंबकेश्वर परिसरातील विविध ठिकाणांसाठी वनविभागाने मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केल्या आहेत. राज्यातील पर्यटनस्थळे सुरक्षित करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत. ज्या क्षेत्रांवर अशा उपायोजना करणे शक्य नाही, अशी पर्यटनस्थळे तूर्तास बंद करण्याचे आदेश पुणे जिल्हाधिकाऱ्यांनी काढले आहेत. अशी वेळ प्रशासनावर का आली? याचे उत्तर गेल्या काही दिवसांतील काही दुर्दैवी घटनांनी दिले आहे. पाण्याचा, समुद्राचा आणि धबधब्यांच्या खोलीचा अंदाज न आल्याने काही पर्यटकांचा मृत्यू झाला आहे. अतिधाडस, निसर्गाला गृहीत धरण्याच्या वृत्तीत होत चाललेली वाढ, मित्रांना काहीतरी करून दाखवण्याची खुमखुमी आणि फाजील आत्मविश्वास ही त्यामागची काही कारणे आहेत. समाज माध्यमांवर रिल करून टाकणे आणि वाहवा मिळवणे याची त्यात आणखी भर पडली आहे. समाज माध्यमांचा प्रभाव वाढल्यापासून अशा ठिकाणांना भेटी देणाऱ्या हौशानवशा-गवशांची गर्दी वाढत आहे. खरे तर निसर्गाच्या सान्निध्यात काही काळ घालवणे, त्याची विविध रूपे अनुभवणे, त्यानिमित्त पशुपक्ष्यांचा दूरस्थ सहवास अनुभवून ताजेतवाने होणे हा एक उद्देश असावा, असे तज्ज्ञ आणि जाणत्यांना अपेक्षित आहे. अशी स्थळे परिचित नसतात. त्या वाटा अनवट असतात. त्यामुळे अशा ठिकाणी स्थानिकांच्या सूचनांचा आदर करणे किंवा मार्गदर्शकासमवेत स्थळदर्शन करणे हिताचे ठरते. तथापि पर्यटनस्थळी जाऊन प्रचंड गोंधळ घालणे, मद्य पिऊन अंगविक्षेप करून नाचणे आणि हुल्लडबाजी करण्याकडेच कल वाढलेला आढळतो. परिणामी दुर्घटना घडून अनेकांचे मृत्यू ओढवतात. अनेक ठिकाणांवर बंदी घातली जाते. मार्गदर्शक सूचनांचे फलक लावलेले आढळतात. त्याची दखल किती पर्यटक घेतात? गर्दी व्यवस्थापनाचा विचार करणे सरकारचे कर्तव्य आहे. ते सरकारने पार पाडायला हवे. माऊंट एव्हरेस्टपासून विविध पर्यटनस्थळांवर पर्यटकांच्या बेशिस्तीमुळे साचणारा कचरा हा चिंतेचाच विषय आहे. सामाजिक भान हरवत चालल्याची ही लक्षणे मानावीत का?

पान १ वरुन

### अक्कलकोटमध्ये गुरूपौर्णिमेसाठी

गुरूपौर्णिमेचा दिमाखदार सोहळा संपन्न होत असून गुरूपौर्णिमेच्या दिवशीच अन्नछत्र मंडळाचा ३७ वा वर्धापन दिन असल्यामुळे मंडळाच्या विस्तीर्ण प्रांगणात गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या धर्मसंकीर्तन व सांस्कृतिक सोहळ्याची सांगता समारंभपूर्वक होत आहे. ज्येष्ठ गायक, संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर व त्यांच्या कन्या राधा मंगेशकर यांच्यासह आघाडीचे गायक महेश काळे, आर्या आंबेकर, आदेश बांदेकर यांच्या कलाविष्काराला भाविक व प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. समीर चौगुले, प्रभाकर मोरे, ओंकार राऊत, ईशा डे, नम्रता संभेराव, चेतन भट आदी कलावंतांची 'हास्य जत्रा' तुफान गाजली. सिने अभिनेत्री संस्कृती बालगुडे यांच्या 'भक्तिरंग' कार्यक्रमासह निवृत्ती महाराज देशमुख-इंदोरीकर यांच्या कीर्तनाने रंगत आणली. अन्नछत्र मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष जन्मेंजयराजे भोसले व प्रमुख कार्याकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या अधिपत्याखाली गुरूपौर्णिमा आणि अन्नछत्र मंडळाच्या वर्धापन दिन सोहळ्याचे नियोजन करण्यात आले आहे. सुमारे एक लाख भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली जाणार आहे. अन्नछत्र मंडळाच्या भक्तनिवासामध्ये पाच हजारापेक्षा जास्त भाविकांची निवास व्यवस्था झाली असून संपूर्ण भक्तनिवास भरून गेले आहे. दरम्यान, अन्नछत्र मंडळाने सुमारे ६५ कोटी रुपयांचा खर्चाच्या पाच मजली महाप्रसादगृहाची उभारणी हाती घेतली आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजनही गुरूपौर्णिमेला होत असल्याचे अमोलराजे भोसले यांनी सांगितले.

### पश्चिम घाटात संततधार सुरूच,

शिरले आहे. मांगले, सावर्डे पुलावर पाणी आल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. आज सकाळी आठ वाजेपर्यंत चांदोली धरणाच्या परिसरात ६० मिलीमीटर पाऊस झाला तर कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कोयना येथे ८५ महाबळेश्वरमध्ये ९५ आणि नवजा येथे १०० मिलीमीटर पावसाची नोंद झाली असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली. चांदोलीत २३.५४ तर कोयनेत ५०.७७ टीएमसी जलसंचय झाला आहे. दरम्यान, पंचगंगा, दूधगंगा, कृष्णा, वारणा आणि घटप्रभा या नद्यातील पाणी पातळी संततधार पावसाने वाढत असून कोल्हापूर, सांगलीला संभाव्य महापुराचा निर्माण झालेला धोका सौम्य करण्यासाठी अलमट्टी धरणातून आज दुपारी दीड वाजल्यापासून १ लाख क्युसेकचा विसर्ग करण्यात येत आहे. या धरणात आज सकाळी पाण्याची आवक ६५ हजार ४८० क्युसेक होती, तर विसर्ग ६५ हजार क्युसेक होता. यामध्ये ३५ हजार क्युसेकने वाढ करण्यात आली आहे.



स्वामींचे भक्त संपूर्ण भारतभरातून अक्कलकोट येथे दर्शनासाठी येतात. काळानुरूप भक्त मंडळींच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होते आहे. १९८८ पासून आज पर्यंत स्वामी समर्थांच्या अन्नछत्र मंडळात अनेक वैशिष्टयपूर्ण बदल घडले आहेत. पण या सर्व भक्तमंडळींना अन्नपूर्णे सदा पूर्णे शंकर प्राण वल्लभे, ज्ञान वैराग्य सिध्यर्थं भिक्षान् देहीच पार्वती या श्र्लोकाची प्रचिती अन्नपूर्णेच्या रूपात देत, स्वामींच्या कृपा प्रसादाचा लाभ मिळवून दिला आणि अन्नदानाच्या या महाचळवळीचा पाया रचला तो श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासच्यावतीने. १९८८ पासून अतिशय पुण्याचं पण तेवढंच आव्हानात्मक व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे काम संस्थापक अध्यक्ष माननीय श्री जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या माध्यमातून अविरतपणे सुरू आहे.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासच्या या स्वामी कार्यावर टाकलेला हा एक दृष्टिक्षेप..

स्वामी सेवेचा ध्यास आणि अक्कलकोट येथे येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी या उद्देशाने, गुरूपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर सन १९८८ मध्ये सन्माननिय श्री. जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज यांनी, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे प. पू. श्री. मोहन पुजारी आणि आपल्या इतर सहकार्यांच्या सहयोगाने, अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत या धर्मादाय न्यास ची मुहूर्तमेढ रोवली. अन्नछत्राच्या उभारणी वेळी संस्थापकअध्यक्ष मा.श्री.जन्मेजयराजे यांनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर प्रथमतः ३ किलो तांदळाचा प्रसाद स्वामींना महानैवेद्य म्हणून दाखवला, भाविकांना महाप्रसाद दिला आणि अन्नछत्र मंडळाची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. या धर्मादाय संस्थेचे रजिस्ट्रेशन (नोंदणी) झाल्यानंतर, सार्वजनिक धर्मादाय न्यास अस्तित्वात आले.


कै.अंबुबाई सरदेशमुख या मातोश्रींनी उदार अंत:करणाने वटवृक्ष मंदिराच्या उत्तर महाव्दारालगत स्वतःच्या जागेत अन्नछत्र सुरू करण्यास परवानगी दिली. सुरवातीला अगदी लहान स्वरूपात हे कार्य सुरू होते. पण दिवसेंदिवस स्वामी भक्तांची वाढणारी गर्दी लक्षात घेता, या धर्मादाय न्यासाने देवस्थानच्या दक्षिण बाजूस कै.वीरभद्र कोळ्ळे यांच्या मालकीच्या जागेची रीतसर खरेदी करून, त्या जागेवर नियोजनपूर्वक मोठे पत्राशेड उभारून सन १९९४ मध्ये अन्नछत्राचा कार्य विस्तार केला. सध्याचे अन्नछत्र हे प्रशस्त आणि वातानुकूलित आहे. अनेक स्वामी भक्तांनी या पुण्यकार्यात सढळ हस्ते देणग्या दिल्या. देणग्यांचा ओघ ही वाढला आणि आजही तो सुरु आहे.सुरवातीच्या काळात एस.टी.महामंडळाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सढळ हाताने मदत करून या कार्यास हातभार लावला. तसेच सोलापूरचे कै.बाळासाहेब शिंदे व कै.शिवाजीराव पिसे महाराज यांनी या कार्यासाठी खंबीर साथ दिली. त्याचप्रमाणे अॅड.मा. श्री.सुरेशचंद्र भोसले,पुणे आणि सन्मा.अॅड.श्री नितीनजी हबीब यांनी या स्वामी कार्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करीत मोलाची साथ दिली आहे. १९८८ पासून न्यासाचे विद्यमान सचिव श्री शामराव मोरे यांनी बहुमोल योगदान देऊ केले आहे.

स्वामी भक्तांचे व शहरवासी यांचे श्रध्देचे स्थान असलेल्या शमी विघ्नेश गणेशाची स्थापना १९९२ साली'यात्रीभुवन' समोर शमीच्या विशाल वृक्षाखाली करून सुंदर असे मंदिर त्या ठिकाणी उभारलेले आहे .या गणेशाची नित्योपचार व पूजा होत असून येथे श्री गणेश जयंती व श्री गणेश चतुर्थी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

सर्व स्वामी सेवेकऱ्यांच्या सहकार्याने, अन्नछत्र मंडळाचे कार्य आजतागायत अविरतपणे सुरू आहे. आजमितीसश्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात दररोज दोन्ही वेळेस १५ ते २० हजारांवर स्वामीभक्त, महाप्रसादाचा लाभ घेऊन तृप्त होतात. उत्तम नियोजन, भक्तांच्या गर्दीचे सुयोग्य व्यवस्थापन, महाप्रसादासाठी गुणवत्तापूर्ण अन्नधान्याचा व भाजीपाल्याचा वापर करण्याची दक्षता घेतली जाते तसेच सर्व गुणवत्ता मानकांची काळजीपूर्वक अंमलबजावणी ही केली जाते. तसेच वॉटर सॉफ्टनर च्या माध्यमातून भक्तांना क्षार विरहित व आर.ओ.(ठज)चे पिण्याचे पाणी दिले जाते. दररोज केल्या जाणाऱ्या महाप्रसादात पोळी, मसालेभात, शिरा किंवा गव्हाची खीर, सांजा, आमटी, बटाटा- वांगी - काकडी भाजी, पालेभाज्या, पापड तर रात्री साधाभात,पोळी,भाजी,आमटी असे प्रसादाचे स्वरूप असते. एकादशीच्या दिवशी साबुदाणा खिचडी, दही, भगर, आमटी, खजूर, केळी असे उपवासाचे पदार्थ असतात. दररोज सकाळी ठीक ११.३० वा. मंदिरात अतिथी व मान्यवर देणगीदारांच्या हस्ते स्वामींना महानैवेद्य दाखवून, अन्नछत्रात महाआरती व संकल्प पार पडतात. यानंतर सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद दिला जातो. यासाठी अन्न व औषध प्रशासन महाराष्ट्र राज्य यांची प्रमाणपत्र आयएसओ मूल्यांकन प्रमाणपत्र व भारत सरकारचे भोग प्रमाणपत्र ही मिळालेले आहे. येथे सुमारे ३०० सेवेकरी असून त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ त्यांना मिळणाऱ्या मानधनातून चालतो.

परगावच्या स्वामी भक्तांच्या निवासाच्या दृष्टीने यात्री निवास, यात्री भुवन ,अतिथी , गणेश मंदिर यात्री थांबा या निवासी इमारती बांधल्या असून यामध्ये स्वामी भक्तांना सोयी सुविधा देऊ केल्या आहेत .यात्री निवास ही भव्य इमारत २००३ पासून पासून स्वामी भक्तांच्या सेवेत रुजू झालेली आहे या इमारतीमध्ये मिनी हॉल सह कॉमन ६६ खोल्या असून १४ मोठे हॉल आहेत पैकी दहा हॉलमध्ये बेडची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या इमारतीमध्ये सुमारे १५००भक्त निवासाला थांबू शकतील इतकी क्षमता आहे . यात्री भुवन या इमारतीत नॉन एसी सुट आणि एसी सुट तसेच डीलक्स एसी सुटस आहेत. सदर इमारतीत सुमारे ५०० भक्त निवास करू शकतील इतकी क्षमता . आहे गणेश मंदिर यात्री थांबा या इमारतीत एकूण बारा एसी सुट असून सुमारे ५० भक्त निवास करू शकतील इतकी क्षमता आहे. अतिथी निवास ही इमारत सुद्धा एसी असून येथे सुद्धा ५० भक्त विश्रांतीस राहू शकतील इतकी क्षमता आहे त्याचप्रमाणे स्वतंत्र पलंग व्यवस्था सुरू असून याची क्षमता ६१ इतकी आहे या सर्व इमारतीत लिफ्ट यंत्रणा कार्यान्वित असून अग्निशमन यंत्रणा सुद्धा बसविलेली आहे.सद्यस्थितीत अन्नछत्र मंडळाच्या परिसरात प्रशस्त आणि भव्य असे ४ एकरातील वाहनतळ, वाहनतळ शेड तसेच २७० के.वी. क्षमतेचा सोलर प्रकल्प कार्यान्वित आहे. अन्नछत्रामध्ये मा.जन्मेजयराजे भोसले महाराज, संस्था.अध्यक्ष यांनी स्वतः पुढाकार घेऊन सागवानी व उत्तम कलाकुसर केलेला असां स्वामींचा रथ केला असून हा रथ प्रतिवर्षी श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी वेळेस ७ दिवस पहाटे वेळेस शहरातून नगर प्रदक्षिणेस निघत असतो.

भोसले घराण्याशी असलेले जुना ऋणानुबंध जपत भारतरत्न, गानसम्राज्ञी,आदरणीय स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांनी त्यांच्या वापरात असलेली दोन वाहने भेट म्हणून देऊ केलेली आहेत. न्यासाने मंडळाच्या परिसरामध्ये ती वाहने जतन करून ठेवलेली आपल्याला पाहायला मिळतात.




महाराष्ट्राची संस्कृती आणि इतिहास दर्शन घडवणारे शिव चरित्र, धातुशिल्प प्रदर्शन भक्तांना पाहण्यासाठी उभारण्यात आले आहे. भारतरत्न गानसमाज्ञी आदरणीय लतादिदी मंगेशकर यांचेही मार्गदर्शन वेळोवेळी या न्यासास लाभलेले आहे. गडकिल्ले सृष्टी ही त्यांच्याच संकल्पनेतून साकारण्यात आली आहे. अतिथी निवासाजवळ स्वामींची महती भक्तांना कळण्यासाठी श्री स्वामी समर्थ जीवन चरित्र भित्ती शिल्प साकारण्यात आले आहे.

अतिशय निसर्गरम्य वातावरणात सुशोभित आणि हिरवळीने नटलेल्या या आवारात श्री स्वामी समर्थ वाटिका व बालोद्यान सर्वांचेच लक्ष वेधून घेतात.

न्यासाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे प्रतिवर्षी भव्य प्रमाणात आयोजित करण्यात येणारे गुरुपौर्णिमा आणि वर्धापन दिन हा महोत्सव. या १०



दिवसिय धर्मसंकिर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्रामधील दिग्गज प्रवचन- कीर्तनकार, गायक कलाकार आपली सेवा स्वामींच्या चरणी रुजू करतात. त्याचप्रमाणे १९८८ पासून स्वामी दर्शनास, उत्सवास व कार्यक्रमाच्या निमित्त्य अन्नछत्रास वेळोवेळी सदिच्छा भेट देऊन व मार्गदर्शन करणाऱ्या दिग्गज मंडळी, मान्यवर व सन्मा.देणगीदार यांनी न्यासाचे कार्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भक्तीचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने, प्रतिवर्षी श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा काढण्यात येते. पश्र्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण, गोवा, कर्नाटक या राज्यातील स्वामी भक्तांना या माध्यमातून स्वामींच्या दर्शनाचा लाभ अन्नछत्र मंडळाच्या वतीने देण्यात येतो. सन १९९८ पासून ही पालखी परिक्रमा अखंडितपणे सुरू आहे.

अन्नदानाच्या या पवित्र कार्याबरोबरच, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ न्यासाच्यावतीने अनेक सामाजिक कार्यांना हातभार लावला गेला आहे आणि या माध्यमातून लोकाभिमुख अशा कामांना, कायमच प्राधान्य दिले जाते. त्या समाजोपयोगी कार्याचा हा आढावा

१९९३ च्या किल्लारीच्या महाविनाशकारी भुकंपाच्या वेळेस या न्यासाने सलग एक महिना दररोज ट्रक भरून अन्नवाटप केलेले आहे.

सामाजिक बांधिलकीचे भान ठेवत या न्यासाने अक्कलकोट शहर विकास कार्यासाठी मोठे योगदान दिले आहे. स्वमालकीच्या जमिनीपैकी ४१/२एकर जागा मुस्लीम कब्रस्तानास, ३एकर जागा लिंगायत स्मशानभूमीसाठी आणि ११/२एकर जागा बाह्यवळण रस्त्यास तसेच भक्तांच्या सोयीसाठी सुलभ शौचालयाकरीता मुस्लिम कब्रस्तानाजवळ स्वमालकीची जागा नगरपरिषदेस दिली आहे .

८ कि.मी. अंतरावर असलेल्या गळोरगी येथील स्वमालकीच्या विहीरीतून ५ कोटी खर्चून अन्नछत्रासाठी कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना केली आहे, तसेच वटवृक्ष देवस्थानाससुध्दा पाणी देऊ केले आहे.

२०१४ मध्ये उद्भवलेल्या तीव्र पाणीटंचाई आणि दुष्काळजन्य परिस्थितीमध्ये अन्नछत्र मंडळाच्या वतीने, गळोरगी येथील स्व-मालकीच्या विहिरीतून पाईप लाईनव्दारे पाणी आणून सलग बारा महिने दररोज १२ लाख ५० हजार लिटर पाणी अक्कलकोट नगर परिषदेस देण्यात आले.

हे न्यास भूकंपग्रस, जळीतग्रस्त , पूरग्रस्तांना तातडीने मदतीचा हात पुढे करते तसेच गरिब व गरजवंताना शैक्षणिक व वैद्यकीय मदत करते.

ऑगस्ट २०१९ ला कोल्हापुर व सांगली तसेच डिसेंबर २०२१ ला चिपळूण येथील पुरग्रस्तांना तातडीने जीवनावश्यक वस्तू व अन्नधान्य शिधा वाटप करून, आपलं योगदान दिले आहे.

सर्व सण ,उत्सव व इलेक्शन ड्युटीस कार्यरत असणारे सर्व शासकीय कर्मचारी व पोलीस बांधवांच्या भोजनाची व्यवस्था सुद्धा न्यासाकडून केली जाते. पोलिओ लसीकरणाचे वेळेस शहरातील कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना भोजन व्यवस्था केली जाते. शासनाचे विविध उपक्रमास हे न्यास सर्वोतोपरी सहकार्य करते.

राज्य परिवहन मंडळाच्या बाहेर गावाहून मुक्कामी येणाऱ्या सुमारे ४० ते ४८ बसेसच्या चालक व वाहकांना सुद्धा अद्ययावत असे विश्रांती कक्ष व वाहनतळ न्यासाकडून या परिसरामध्ये उपलब्ध करून दिलेले आहे.

आतापर्यंत प्रति महिन्याची पौर्णिमा व मंडळास साजरा केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या उत्सवा प्रसंगी २०१४ पासून सुमारे २०,००० पेक्षाही जास्त रात्क्दात्यांकडून रक्त संकलन केले आणि खऱ्या अर्थाने रक्तदानाची चळवळ अक्कलकोट तालुक्यात रुजविली. तसेच स्वामी भक्तांसाठी अद्ययावत वैद्यकीय सुविधांनी युक्त अँब्युलन्स सेवा आणि फायर ब्रिगेड ची व्यवस्था उपलब्ध आहे.

दिव्यांग व वृद्ध लोकांना अन्नछत्रपरीसरात ने आण करण्यासाठी इलेक्ट्रिक बग्गी व व्हीलचेअरची सोय केली आहे.

हे धर्मादाय न्यास शासनाच्या विविध योजना व कार्यक्रमास नेहमी भरीव सहकार्य करीत असते. सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक, पर्यावरण विषयक, क्रिडाविषयक व सांस्कृतिक उपक्रम सदैव राबवित असते. स्त्रिभृण हत्या, हुंडाबळी, महिला आरोग्य, वृक्षे लावा व जगवा, जल साक्षरता अभियान, स्वच्छता अभियान इ. कार्याच्या माध्यमातून हे न्यास सदैव अग्रेसर आहे.

वृक्षारोपण आणि त्याचे संवर्धन या महत् कार्यात सोलापूर-अक्कलकोट रस्त्याच्या दुतर्फा, वडाची झाडे लावून त्याचे जतन आणि संवर्धन करण्यात आले. शहरातील चौकाचे सुशोभीकरण केले आहे. फत्तेसिंह मैदानावर बसण्यासाठी सुमारे ४० नग सिमेंट बाकडे बसविले असून वृक्षारोपण व संवर्धन करून नगरपालिकेच्या विकास कार्यात मोठे योगदान देऊ केले आहे. अक्कलकोट शहराच्या विकासामध्ये श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने मोलाची भूमिका बजावलेली आहे. न्यासाच्या १९८८ पासून अविरत सेवेमुळे अक्कलकोट शहरातील व लगतच्या भागातील लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध झालेला आहे.

अन्नछत्राच्या चौकात पोलीस चौकी, तहसील कार्यालय आणि ग्रामीण रुणालय, या ठिकाणी कायमस्वरूपी शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

कोरोना काळात सामाजिक जाणिवेतून पुणे येथील कलावंताना मे २०२१ मध्ये मदत म्हणून सुमारे ३०० अन्नधान्य किटचे वाटप केले आहे. याच दरम्यान, अक्कलकोट येथील ग्रामीण भागात तसेच सोलापूर येथील गरजवंताना १२०० अन्नधान्य किट वाटप करण्यात आले. कोविडच्या आणि लॉकडाऊन च्या काळात, अक्कलकोट शहरामध्ये दररोज सुमारे १००० गरीब लोकांना तीन महिने जेवण वाटप केले. एकूण ५२ दिवसात ५१,५०० लोकांना अन्नवाटप केले आहे. शहरात व ग्रामीण भागात सॅनिटायझर ची फवारणी वेळोवेळी केली.

यात्रीनिवास या निवासी इमारतीमध्ये शासनाचे कोविड सेंटर सुरू केले. तेथील पॉझिटिव्ह रुग्णांना दररोज चहा, नाष्टा, दोन वेळचे जेवण देण्याचे कार्य केले आहे. कोव्हिड सेंटरला स्थानिक प्रशासनाच्या मागणीनुसार ५० बेड, ५० गाद्या, ५० उशा व बेडशिटस देत व्यवस्था करण्यात आली तसेच ससून हॉस्पिटल पुणे येथे व्हेंटीलेटर देऊ केले आहे.

यत्र नार्यस्तू पुज्यंते रमंते तत्र देवता, या उक्तीला सार्थ करत, स्त्री शक्ती प्रति आदर व्यक्त करण्यासाठी हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून हे न्यास उल्लेखनीय कार्य करीत आहे.

न्यासाचे संस्थापक अध्यक्ष श्री. जन्मेजयराजे भोसले यांच्या बहुमोल मार्गदर्शनाखाली, दत्तजयंती २०२१ पासून 'समर्थ महाप्रसाद सेवा' सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, अक्कलकोट शहरातील दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या जवळपास २६० गरीब, गरजवंत व निराधार लोकांना दैनंदिन दोन वेळेचे जेवण, डब्यातून घरपोच करण्याचे कार्य, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळामार्फत करण्यात येत आहे.

२०२१ मध्ये अन्नछत्रात अध्यक्षांचे कार्यालयालगत वटवृक्षाखाली असलेल्या जुन्या दत्त मंदिराची काळ्या पाषाणात उभारणी केली असून आतील सुंदर व देखणी दत्तमूर्ती जयपूरहून आणून स्थापित केली आहे.

अन्नछत्राच्या पूर्वेस समर्थ वाटिकेजवळ, कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेच्या काळ्या पाषाणाच्या मंदिराचे बांधकाम प्रगतीपथावर असुन अल्पावधीतच हे काम पुर्णत्वास जाणार आहे आणि भक्तांना दर्शनासाठी खुले होणार आहे.

ऑक्टोंबर २०२३ पासून सोलापूरच्या बी.सी. गर्ल्स हॉस्टेल मधील अनाथ १५० मुलींच्या भोजनासाठी दरमहा अन्नधान्य व खाद्यतेल पुरवठा केला जातो. जानेवारी २०२४ पासून तालुक्यातील ५५ कुस्तीगीरांना दरमहा तूप, खारीक, बदाम, अक्रोड इत्यादींचे खुराक वाटप सुरू केले आहे.

न्यासाने जगभरातील स्वामी भक्तांच्या सोयीसाठी मंडळात चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती ुराळरपपरलहर्रीर.ेसया संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे.न्यासास देणगी देणाऱ्या देणगीदारास आयकरात ८० ची कलमान्वये सवलत आऋहे.

स्वामी भक्तांचे सोयीसाठी आणि ऑनलाइन देणगी देणे सहज सुलभ व्हावे यासाठी न्यासाने क्यू आर कोड प्रणाली सुद्धा विकसित केलेली आहे.

श्री स्वामी समर्थांची आध्यात्मिक महती, त्यांचं कार्य, हे इतकं ओजस्वी आहे की, त्यांचे अनुयायी, भक्तगण यांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत आहे आणि भविष्यातही ही संख्या वाढतच राहणार. ही महत्वपूर्ण बाब लक्षात घेऊन, सध्याच्या जुन्या महाप्रसाद गृहालगतच्या वाहनतळशेड, याठिकाणी भव्य नियोजित महाप्रसाद गृह साकारण्यात येणार असून नवीन तंत्रज्ञानाने परिपूर्ण असलेला, अभ्यासपूर्ण आराखडा अन्नछत्र मंडळाच्या वतीने सादर करण्यात आला आहे.

एक दृष्टिक्षेप- नव्याने बांधण्यात येणाऱ्या नियोजित महप्रसादगृहाच्या वास्तूवर.

नियोजित ५ मजली महाप्रसादगृहाची इमारत ही भव्य आणि मंदिर सदृश्य असणार आहे. ही इमारत पूर्णपणे वातानुकुलित् असून या इमारतीचे बांधकाम क्षेत्र १ लाख १९,३९८ चौरस फुट असणार आहे. इमारतीच्या टेरेसवर श्री स्वामी समर्थांची ५१ फुटांची सुंदर, रेखीव आणि भव्य मुर्ती, सर्वांचे लक्ष वेधून घेईल.

या नवीन नियोजित महप्रसादगृहात २५०० भाविकांची महाप्रसादाची व्यवस्था असून, या आराखड्याच्या माध्यमातून हे पाहू शकता की, एकूण ५ हजार भाविकांसाठी सर्व सोयी सुविधांनी युक्त अशा प्रतिक्षा कक्षाचे नियोजन करण्यात आले आहे. शिवाय या इमारतीच्या तळघरामधे धान्य- भाजीपाला कोठार, चटणी व पिठाची गिरणी तसेच १ तासामध्ये ८०० चपाती तयार करता येणाऱ्या ७ मशिन्स, आणि भांडे धुण्यासाठी डिश वॉशर यांची देखील सोय आहे. संपूर्ण इमारतीमध्ये अग्निशामन यंत्रणा बसविण्यात येणार आहे.

सदर इमारतीचे बांधकाम करण्याची पुर्वतयारी झाली असुन ही सर्व अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज व प्रशस्त इमारत, स्वामी भक्तांच्या देणगीतून साकार होणार आहे.

या बांधकामाचा सर्वसाधारण अंदाजे खर्च रुपये ६० कोटी, इतका अपेक्षित आहे. सदर इमारतीस नगरपालिकेची रीतसर बांधकाम परवानगी घेतली आहे आणि अल्पावधीतच या इमारतीचे बांधकाम सुरू करण्याचा मानस आहे.

।। श्री स्वामी समर्थ ।।

सदर नियोजित भव्य अशा५ मजली महाप्रसादगृह इमारतीचे भूमिपूजन दि.२१-७-२०२४, वार रविवार रोजी सकाळी ११ वा. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचे हस्ते संपन्न होणार आहे.- **शामराव मोरे सचिव**

**श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, श्रीक्षेत्र अक्कलकोट**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# शिक्षकांनी मुलांना ज्ञाना बरोबर स्वच्छता आणि शिस्तीच्या शिकवण द्यावे : प्रशांत अरबाळ



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः शिक्षकांनी मुलांना शिक्षणा बरोबर स्वच्छता व शिस्थिच्या शिकवण द्यावे.असे प्रतिपादन अक्कलकोटचे गट शिक्षणाधिकारी श्री प्रशांत अरबाळ यांनी व्यक्त केली आहे. नुकत्याच अरबाळ साहेब हे जि प प्राथमिक मराठी केंद्र शाळा दुधनी येथे अचानक भेट दिली.याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती कडून त्यांच्या स्वागत व सत्कार अध्यक्ष श्री गोरखनाथ धोडमनी यांच्या हस्ते पेटा बांधून पुष्पगुच्छ देऊन सत्कार केली. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री गोरखनाथ धोडमनी शिक्षण तज्ञ श्री सैदप्पा झळकी,सदस्य महेदिमिया जिडगे,सिध्दाराम (बाबा)टक्कळकी,व श्री पोमु राठोड सर, म्हेत्रे मॅडम, अंजली गुंजोटि मॅडम,मुख्याध्यापक श्री श्रीसैल मलगण सर, कोरचगांव सर,अंजली गुंजोटे,शोभा म्हेत्रे या शिक्षक-शिक्षकी उपस्थित होते.

**दुधनी शाळेला दुर्लक्ष करु नये व गडीनाड कन्नड भागाला आता पर्यंतचे सर्व अधिकारी दुर्लक्ष करत आलेली आहे. म्हणून प्रगती कुंठीत झाली आहे.तरी आपण जातीने लक्ष देऊन विकास करण्यात यावे.असे मा.गटशिक्षण अधिकारी श्री प्रशांत अरबाळ साहेबांना आव्हाहन शिक्षण तज्ञ श्री सैदप्पा झळकी यांनी केली**

# श्री विठ्ठल निर्मिती दिंडी पुरस्काराचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या हस्ते वितरण

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या मार्फत आषाढी यात्रेतील सर्व सोहळ्यातील बऱ्याच दिंड्या हे सर्व कार्य करत आहेत त्यांच्या कार्याचा उचित असा सन्मान व्हावा त्याचप्रमाणे इतर दिंडी नाही याचा आदर्श घेऊन या निर्मल वारी हरिद्वारी अभियानामध्ये सहभाग घ्यावा या जाणिवेतून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या मार्फत आषाढी यात्रा कालावधी श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार सन २०१८ पासून सुरू करण्यात आला आहे

यामध्ये श्री संत तुकाराम महाराज वंशज देहूकर दिंडी यांना एक लाख रुपयांचा प्रथम पुरस्कार दानेवाला निकम दिंडी यांना ७५ हजाराचा द्वितीयपूर क्रमांकाचा पुरस्कार श्री गुरु बाबासाहेब आजरेकर दिंडी यांना ५०००० क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला यावेळी मंदिर समितीचे आरोग्य दूध पुस्तकाचे प्रकाशाने माननीय मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाला या प्रसंगी मंदिर समितीचे अध्यक्ष श्री गहिनीनाथ महाराज औसेकर श्री विठ्ठल निर्मिती पुरस्कार समितीचे अँड माधवीताई निगडे ह भ प भास्कर जवंजाळ उच्च मित्र ह भ प शिवाजीराव मोरे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील मंत्री दीपक केसरकर मंदिर समिती सदस्य शकुंतला नडगिरे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके वारकरी बंधू व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते




# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात गुरुपौर्णिमा उत्साहात साजरा

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी : महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय व मातोश्री गुरूबसव्वा कल्याणशेट्टी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुपौर्णिमेनिमित्त गुरूवंद कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला. प्रथम स्वामी समर्थ व दत्तात्रय तसेच संस्थापक कै.पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांकडून उपस्थित सर्व मराठी,कन्नड व सेमी इंग्रजी शिक्षकांचा पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ऐश्र्वर्या माळी, दानेश्र्वरी बगले, धनेश्र्वरी बिराजदार, प्रीती फुलारी या मुलीनी सुंदर समुहनृत्य सादरीकरण केले. स्नेहा देडे, अंतरा चौगुले, संस्कृती शिरसागर, अक्षरा साठे, आफरीन शेख, कोमल कोरे, सिद्धी होटकर, समृद्धी चौगुले, अल्फीया शेख, धनेश्र्वरी घंटे, महेश्र्वर स्वामी, सोमनाथ भुरले, शुभांगी पाटील, विजयालक्ष्मी हिळ्ळी, रणवीर टोणपे, पल्लवी सोलंकर, सुमया शेख या विद्यार्थ्यानी भाषण करताना गुरूंबद्दल महती सांगून त्यांच्याप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केले. या कार्यक्रमास संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी, सीईओ रूपाली शहा, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभाग प्रमुख दिगंबर जगताप,प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, सेवानिवृत्त शिक्षक खंडेराव घाटगे, सेवानिवृत्त पर्यवेक्षक शिवानंद पुजारी, पर्यवेक्षक सुरेश रूगे, आदी मराठी, कन्नड, सेमी विभागाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. प्रज्ञा दसाडे हीने केली. सूत्रसंचलन कु. वैष्णवी टपाले यानी केले तर कु.भाग्यश्री बिराजदार ही सर्वांचे आभार मानले.



**गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे नियोजन विद्यार्थ्यांकडून करण्यात आले होते. एकाही विद्यार्थ्यांस शिक्षकानी भाषण लिहून दिले नव्हते, तर सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे भाषण करण्यासाठी पुढे येत होते.**

# उज्वल भविष्यासाठी चांगल्या शिक्षणाची गरज: हभप काळे महाराज

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

निफाडः उज्वल भविष्यासाठी चांगल्या शिक्षणाची गरज असून विद्यार्थ्यांनी सतत अध्ययनशिल असावे असे मत विजयनगर धोडंबे येथील कीर्तनकार हभप काळे महाराज यांनी धोडंबे येथे आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.येथील मविप्र समाजाचे क का वाघ हायस्कूल,धोडंबे येथे गुरुपौर्णमेनिमित्त शिक्षक सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते,त्याप्रसंगी ते बोलत होते.महाराजांनी उद्बोधन करताना पुढे सांगितले की आज व्यसनाधीनता तसेच अनेक चुकीच्या मार्गावर पिढी चालली आहे ह्यासाठी चांगले विचार,अध्यात्मिक विचार जोपासण्यासाठी गुरू असणे गरजेचे आहे.गुरू असेल तर प्रपंच सुखाचा होतो.कार्यक्रमाचे आयोजन इयत्ता १० वी आ च्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षक शरद सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.प्रारंभी व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महर्षी व्यास मुनी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.विद्यालयातील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी,अभिनव बालविकास मंदिर येथील सेवक वृंद,शालेय पोषण आहार सेवक वृंद ह्या सर्वांचा पेन व गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांनी सत्कार केला.

ह्यावेळी कु यश ढोबळे,तन्वी सोनवणे,अनुष्का जाधव,सेजल सोनवणे,गौतमी रकिबे,रिद्धी सोनवणे,सिद्धी सोनवणे यांनी मनोगते व्यक्त केली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना मुख्याध्यापक एस एम वंजारी यांनी सांगितले की अनुभव हा सर्वात मोठा गुरू असून जीवनात येणाऱ्या अनेक बऱ्या वाईट अनुभवातून आपण शिकत जातो व घडत जातो

कवी सुभाष पवार यांनी गुरूंचे महत्व विषद करताना सांगितले की आपल्या आयुष्यात सद्गुरू असतील तर जीवनाचे सोने व्हायला वेळ लागत नाही.गुरू आपल्याला स्वत्वाची ओळख करून देतात. व त्या विचारानुसार चालले तर जीवनात प्रगती होऊन आपल्या सर्व कार्यात गुणवत्ता वाढते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुमारी प्रतिभा रकिबे हिने केले.तर सूत्रसंचालन पूजा परदेशी हिने केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी १० वीच्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरुन

## मुख्यमंत्री माझी लाडकी..

श्री.पवार म्हणाले, जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत ४ लाख २९ हजार अर्ज प्राप्त झाले आहे. ऑगस्ट महिन्यात अर्ज सादर केलेल्या महिला भगिनींनादेखील जुलै महिन्यापासून लाभ देण्यात येईल. योजनेसाठी प्रत्येक महिन्यात साधारण ३ हजार ५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे योजनेचा लाभ प्रत्येक पात्र महिलेला मिळू शकेल. जिल्ह्यातील सर्व पात्र भगिनींना या योजनेचा लाभ मिळावा यासाठी शहरी आणि ग्रामीण भागात अर्ज भरण्यासाठी सुविधा करण्यात आली आहे.मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत युवकांना प्रशिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी येत्या २७ जुलै रोजी पुण्यात रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या योजनेच्या माध्यमातून युवकांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणार असल्याने भविष्यातही चांगला रोजगार मिळण्यासाठी याचा उपयोग होऊ शकेल. अनेक उद्योगांनी या योजनेसाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली असून प्रशिक्षणार्थींची चांगली कामगिरी असल्यास त्याला कायमस्वरूपी रोजगार देऊ असे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे ही योजना युवकांसाठी रोजगारासाठी चांगली संधी आहे, असे श्री.पवार म्हणाले.

बैठकीत जिल्ह्यातील नद्या व धरणातील प्रदूषणाबाबत चर्चा करण्यात येईल. एमआयडीसी क्षेत्रातील प्रदूषणाबाबत उद्योगमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल. पवना धरण क्षेत्रातील रिसॉर्टमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याबाबत नोटीस देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. साखर कारखान्याद्वारे अशुद्ध पाणी नदीत सोडले जाऊ नये यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, त्यासाठी कारखान्यांच्या प्रतिनिधींसमवेतही चर्चा करण्यात येईल. लोकप्रतिनिधींनीही यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन श्री. पवार यांनी दिले.

शहरी आणि ग्रामीण भागात डेंग्यू प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात, प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, पोलिसांनी ड्रोन विरोधक उपाययोजनांसाठी नाविन्यपूर्ण उपाययोजनांसाठी प्रस्ताव सादर करावा. खडकवासला धरण परिसरात सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापनासाठी पीएमआरडीएने उपाययोजना कराव्यात. क्रीडा साहित्य घेतांना ते दर्जेदार असेल याची दक्षता घ्यावी. कुस्तीसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मॅट घ्याव्यात, असे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले.केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनेतून ज्या विकासकामांना निधी मिळत नाही अशी कामे लोकप्रतिनिधी आणि सदस्यांनी जिल्हा वार्षिक योजनेतून सुचवावी, असे आवाहनही श्री.पवार यांनी केले.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.पाटील यांनी विद्यार्थिनींना शैक्षणिक शुल्क माफ करण्याबाबत माहिती दिली. एकूण ६४२ अभ्यासक्रमासाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. एकूण १ हजार ८०० कोटी रुपये यासाठी खर्च होणार आहे. शुल्काच्या प्रतिपूर्तीची रक्कम महाविद्यालयाने योजनेसाठी सुरू केलेल्या स्वतंत्र बँक खात्यात सप्टेंबर महिन्यात जमा करण्यात येतील. या योजनेच्या समन्वयासाठी स्वतंत्र प्राध्यापक नियुक्त करणे आणि योजनेची माहिती विद्यार्थिनींना देण्याबाबत महाविद्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. येत्या २५ जुलै रोजी राज्यातील ६ हजार महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठीच्या योजनांची माहिती देण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

बैठकीस आमदार उमा खापरे, योगेश टिळेकर, अमित गोरखे, दत्तात्रय भरणे, दिलीप मोहिते पाटील, ड. अशोक पवार, सुनील टिंगरे, चेतन तुपे, सुनील कांबळे, सुनील शेळके, संग्राम थोपटे, माधुरी मिसाळ, राहुल कुल, भीमराव तापकीर, संजय जगताप, सिद्धार्थ शिरोळे, अतुल बेनके, रवींद्र धंगेकर, अश्र्विनी जगताप, जिल्हा नियोजन समिती सदस्य, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पिंपरी-चिंचवडचे मनपा आयुक्त शेखर सिंह, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, पीएमआरडीए आयुक्त योगेश म्हसे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील आदी उपस्थित होते.

बैठकीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, जिल्ह्यातील नद्यांमधील प्रदूषण, गड-किल्ले संवर्धन, पुरंदर आणि जनाई शिरसाई योजना, देहू आणि आळंदी येथे पोलिसांचे निवासस्थान, बिबट प्रवण क्षेत्र, प्राथमिक आरोग्य केंद्रातील मनुष्यबळ आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत खर्चाला मान्यता

पालकमंत्री श्री.पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत २०२३-२४ मधील मार्च २०२४ अखेर झालेल्या १ हजार ४ कोटी ९९ लक्ष रुपयांच्या, अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत १३४ कोटी ९० लाख रुपयांच्या आणि आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत ५१ कोटी ११ कोटीच्या खर्चास मान्यता देण्यात आली. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत २०२४-२५ मध्ये १ हजार २५६ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत १४५ कोटी आणि आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत ५५ कोटी ८९ लक्ष रुपये नियातव्यय अंतिम करण्यात आला आहे. राज्यस्तर बैठकांमध्ये पुणे जिल्ह्याकरिता २०२३-२४ च्या तुलनेत २०२४-२५ मध्ये २५६ कोटी ८९ लक्ष एवढा वाढीव निधी शासनातर्फे मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, महाविद्यालयीन विद्यार्थिनींना व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी १०० टक्के शैक्षणिक शुल्क माफी या योजनांविषयी सदस्यांना माहिती देण्यात आली.

# जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरीचा निरोप घेतल्या यंदाची वारी झाली सुखकर वारी

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीःयंदाची आषाढी वारींना भूतो ना भविष्याची अशी झाली भाविकांच्या अचानक वाढलेल्या संख्येमुळे प्रशासन नुसती चक्रावून गेली तरीही कोणतीही अनुचित घटना न घडता यंदाची वारी सोसोडी झाल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली १६ ते १८ लाख भाविक पंढरी येतात तरीही त्यांना कोणतीही त्रास होत नाही त्यामागे होत होते वारीचे सूक्ष्म नियोजन सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यंदाच्या वारीचे सूक्ष्म नियोजन केले होते पंढरपूरचे प्रांताधिकारी सचिन इथापे आणि तहसीलदार सचिन लंगोटे हे दोन्ही अधिकारी नवीन होते याचवेळी पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांनी पंढरपूरच्या वारीचा अनुभव नव्हता प्रथमपासूनच यंदाची वारी मोठे भरणार असे आखाडे येथील प्रशासनाने बांधले होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ही वारी प्रथमपासूनच मनावर घेतली होती २१ जून रोजी त्यांनी पंढरपूरच्या पत्रकारांची संवाद साधून वारीतील बारकावेची माहिती घेतली होती त्यानंतर प्रशासनाबरोबर तीन बैठका घेऊन नियोजन केले होते वारीच्या अगोदर दोन दिवसापासून त्यांनी पंढरपूरमध्ये मुक्काम ठोकला होता विठुरायाचे दर्शन व्हीआयपी दर्शन नाशिक व पंढरीतील गर्दीवरचे नियंत्रण यावर त्यांनी अगोदरच मार्ग काढलेला होता त्यांनी केलेली स्वप्न पंढरीत आलेल्या भाविकांनी यंदाची वारीही सुखकर झाल्याने बोलून दाखवले आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठी वारे प्रशासनाचे सर्वात अधिकारी नवीन परंतु जिल्हाधिकारी कुंभार आशीर्वाद यांनी केलेल्या नियोजनामुळे हे वारी भाविकांना सहज सुलभ वाटली



**टोकन दर्शन पद्धत लवकरच अमलात आणणार**

पंढरीतील विठोबाच्या दर्शनासाठी टोकन दर्शन पद्धत लवकरच अंमलबजावण्यात येईल याबाबत त्यांनी मुख्यमंत्र्यांकडून मंजुरी करून घेतली व सोलापूरचे जिल्हाधिकारी या पदावर असेपर्यंत मी हे काम आपण नक्कीच मार्गी लावू असा विश्र्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला शुक्रवार दिनांक विजय अभिवादन पंढरपूर सोडताना पत्रकारांशी संवाद साधला व पत्रकारांनी वारे सुखकर होण्यासाठी साथ दिल्याबद्दल त्यांनी पत्रकारांचे आभार मानते

## राजीनाम्यावरून काँग्रेसची मोदी ..

पाहिजे, अशी टीका मल्लिकार्जुन खरगे यांनी केली आहे. मागील काही दिवसांत खोटी जात आणि वैद्यकीय प्रमाणपत्रं सादर केल्याची प्रकरणं पुढे आली आहेत. हा एकप्रकारे एससी, एसटी, ओबीसी आणि ईडब्लूएस प्रवर्गातील लाखो विद्यार्थ्यांचा विश्र्वासघात आहे. हे विद्यार्थी दिवस रात्र मेहनत करून परीक्षेची तयारी करत आहेत. त्यांच्या आशा आकांशावर पाणी फेरण्याचं काम मागील काही दिवसांत झालं आहे, असेही ते म्हणाले.

पुढे बोलताना त्यांनी यूपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्यावरूनही मोदी सरकारला लक्ष्य केलं आहे. यूपीएससीच्या अध्यक्षांनी त्यांच्या कार्यकाळ पूर्ण होण्याच्या पाच वर्षांपूर्वीच त्यांच्या पदाचा राजीनामा दिला आहे. मात्र, त्यांच्या राजीनाम्याचा निर्णय एक महिना गुप्त का ठेवण्यात आला? मागील काही दिवसांत पुढे आलेले घोटाळे आणि यूपीएससीच्या अध्यक्षांचा तडकाफडकी राजीनामा याचा काही संबंध आहे का? असा प्रश्र्न मल्लिकार्जुन खरगे यांनी विचारला आहे. तसेच यासंपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे, अशी मागणीदेखील त्यांनी केली आहे.


श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ (प.ट्र.नं.२२७९) अक्कलकोट ३७ वा वर्धापन दिन आणि
गुरूपौर्णिमा उत्सवाच्या सर्व स्वामी भक्तांना हार्दिक शुभेच्छा.
केंद्रीय मंत्री भारत सरकार
आरपीआय राष्ट्रीय नेते
मा.रामदासजी आठवले
आरपीआय प्रदेश अध्यक्ष
मा.राजाभाऊ सरवदे
प्रमुख कार्यकारी विश्वस्त
मा.अमोलराजे भोसले
आरपीआय तालुका अध्यक्ष
मा.अविनाश मडिखांबे
संस्थापक अध्यक्ष अन्नछत्र मंडळ
मा.जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले महाराज
संपादक
मा.कमलाकर सोनकांबळे
क्रियाशील सभासद
मा.नितीन शिंदे
आरपीआय शहर अध्यक्ष
मा.अजय मुकणार
शुभेच्छुक -
प्रा.राहुल रुही,
संस्थापक अध्यक्ष अक्कलकोट पुणे रहिवासी संघ,पुणे पश्चिम महाराष्ट्र,
आरपीआय नेते (आठवले)